**<u>अबेटमेंट रद्द करण्याचा अर्ज निशाणी क्रमांक ६४ वर</u>**

(पारीत केल्याचा दिनांक **२६ माहे जुलै, २०१७**)

**०१)** प्रस्तुत अर्ज अर्जदार / मयत वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी वादी क्रमांक ०३ विरुद्ध दावा अबेट झाल्याचा आदेश रद्द होण्यासाठी केला आहे.

**०२)** प्रस्तावीत वादी / अर्जदारांचे कथन असे आहे की, वादी क्रमांक ०३ हे दिनांक २८.०२.२०१६ रोजी मयत झाले आहेत. माननीय नामदार उच्च न्यायालयात दाव्याकामी स्थगिती आदेश होता. म्हणून अबेटमेंट आदेश रद्द करुन मिळावा.

**०३)** प्रतिवादीने अर्ज कायदेशीर नाही असे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला.

**०४)** वादपत्राचे अवलोकन केले. वादपत्रावरुन वाद स्थावर मिळकतीचा असल्याचे स्पष्ट आहे. अर्जदार हे मयत वादी क्रमांक ०३ चे वारस आहेत. म्हणून त्यांना प्रतिवादींविरुद्ध दावा पुढे चालवण्याचा हक्क / अधिकार आहे.

**०५)** वादी क्रमांक ०३ मयत झाल्यापासून ९० दिवसात वारसांनी अर्ज दाखल करुन अभिलेखावर वादीपणात सामील होणे गरजेचे होते, परंतु त्यांनी तसे केले नाही. वादी क्रमांक ०३ चे मृत्यूनंतर ९० दिवस पुर्ण झाल्यावर आपोआप कायाद्यानुसार अबेटमेंट होत असते.

**०६)** वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी अबेटमेंट रद्द करण्यासाठी अबेटमेंट झाल्यापासून ६० दिवसात अर्ज करणे गरजेचे होते. वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी अबेटमेंट रद्द करण्यासाठी मुदतीत अर्ज केला नाही.

**०७)** म्हणून वादी क्रमांक ०३ चे वारस त्यांच्या हक्काबाबत सुमारे ३९४ दिवस सजग नव्हते असा अर्थ निघतो. वादी क्रमांक ०३ च्या वारसांवर विलंब माफीच्या अर्जाचा खर्च बसवला आहे. म्हणून त्यांच्यावर पुन्हा खर्च बसवणे न्यायाचे होणार नाही. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

**०१.** अर्जदार /वादी क्रमांक ०३ च्या वारसांनी वादी क्रमांक ०३ विरुद्धचा अबेटमेंट आदेश रद्द करण्यासाठी केलेला अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करावा.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**स्थळ : रोहा.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : २६.०७.२०१७.** **जिल्हा रायगड.**